# प्रेसनोट दि.२८/०८/२०१९

## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## विधीसंघर्षित बालक-पालक बैठकी बाबत

आज दि २८/०८/२०१९ रोजी सांय १७/४५ ते १८/१५ वा चे दरम्यान बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे बिबवेवाडी पोलीस ठाणे व युनिक स्किल डेव्हलपमेंट सेंटर यांचे संयोगाने विधीसंर्घषित बालकांची तसेच त्यांच्या पालकांची मिटिंग आयोजित करण्यात आली होती. सदर मिटिंग मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांनी पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी सुरु केलेल्या भरोसा सेल पोलीस आयुक्तालय कार्यालय पुणे येथे विधीसंर्घषित बालकांसाठी तसेच त्यांच्या पालकांना पिडीत मुलांना मानसिक बळ व आधार, व बालकांचे पुनर्वसन व पिडीत बालकांना वैदयकिय सेवा/मानसोपचार तज्ञ/विधीतज्ञ संरक्षण अधिकरी उपलब्ध करुन देणे तसेच बालकांना गुन्हेगारी कृत्यापासून परावृत्त करणे व चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८ ची माहिती दिली. तसेच कम्युनिटिंग पोलीसिंगच्या संदर्भाने बडी कॉप,भरोसा सेल, व सेवा ॲप रक्षा ॲप पोलीस काका बाबत माहिती देण्यात आली तसेच युनिक स्किल डेव्हलपमेंट सेंटर चे मायकल साळवी यांनी विधीसंघर्षीत बालक व पालक यांना संबोधीत केले त्यांनी गुन्हेगारी व व्यसनांमुळे भविष्यात होणाया दुषपरिणामाबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या पालकांनी त्यांना वारंवार समपुदेश करुन गुन्हेगारी पासून बालकांना कशा प्रकरे दुर ठेवावे तसेच बालकांचे हक्काचे संरक्षण करणे याविषयी मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे, पोलीस उप निरीक्षक श्री वाघमारे तसेच युनिक स्किल डेव्हलपमेंट सेंटर चे सदस्य मायकल साळवी तसेच एकुण १५ ते २० विधीसंर्घषित बालक/पालक व पुणे पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेलचे पोलीस हवालदार देडगे व पोलीस शिपाई दळवी तसेच बिबवेवाडी पोलीस स्टेशन कडील सहा.पोलीस फौजदार श्री शिंदे,पोलीस हवालदार तणपुरे,पोलीस शिपाई गुजर असे उपस्थित होते.


